रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली

शनिवार, दि. ०५ मार्च, २०२२

# मराठी विभाग

## मराठी भाषा गौरव दिन सोहळ्यानिमित्त व्याख्यान

## 'भाषा आणि आपण'

### अहवाल

मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून शनिवार, दि. ०५ मार्च, २०२२ रोजी महाविद्यालयामध्ये 'भाषा आणि आपण' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. संपतराव पार्लेकर यांनी विद्यार्थ्यांनी संवाद साधला. आपल्या मनोगतात ते म्हणाले, ''व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये मातृभाषेचे मोलाचे योगदान असते. नव्या पिढ्यांना आपल्या संस्कृतीची ओळख मातृभाषेतूनच होत असते. भाषा ही आपल्या आईप्रमाणे असते. मराठी भाषा वृद्धिंगत होण्यासाठी संतांनी, साहित्यिकांनी मोलाचे योगदान दिले आहे.''

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम लाभले होते. त्यांनी आपल्या मनोगतात कवी कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांच्या वाङ्मयीन कामगिरीचा आढावा घेतला. तसेच मराठीतील समृद्ध साहित्यिक योगदानाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रस्तुत कार्यक्रमाचे आयोजन मराठी विभागाच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'जागर' भित्तिपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविक व स्वागत डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले; तर आभार विभागप्रमुख प्रा. दिलीप कोने यांनी मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील अध्यापकांसह विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी मौलिक मार्गदर्शन केले.

**निष्पत्ती :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्त्व कळाले.

**लाभार्थी :** ७३





विभागप्रमुख
मराठी विभाग

मराठी विभाग प्रमुख,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)